# मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे कक्ष

३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर –०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सअॅप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :-१४९/२०२२ दिनांक :- २७/०५/२०२२.

**Demat Account वरुन फसवणुक झालेली रक्कम १,१४,४७१/- रुपये तक्रारदाराला परत - सायबर गुन्हे कक्षाची कामगिरी**

दिनांक ०६/०५/२०२२ रोजी सायबर गुन्हे कक्ष येथे तक्रारदार नामे प्रतिक्षा दिपेश राऊत रा, रा. वावते वाडी फुल पाडा सेंट पेस्टर शाळे जवळ विरार (पुर्व) मो.नं. ९८६०४६२८६६ यांचे कडून तक्रारी अर्ज प्राप्त झालेला होता. तक्रारदार यांचे (Zerodha - Dmat Account) यावरुन कोणतेही ट्रान्झसेक्शन न करता दिनांक २९/०४/२०२२ रोजी रात्रीचे १०.२४ वा.दरम्याण` शअर्स **ITC,POLYCAB,INFO,EDGE,MINDTREE** याचे ट्रेडींग खातेक्रमांक १२०८१६००९५०४७९३६ या वर वळते झाल्याचे तक्रारदार यांना मॅसेज आल्याने तक्रारदार यांनी त्यांची ट्रेडींग खात्याची स्टेमेन्ट चेक केली असता त्यांना समजले की, त्यांचे (Zerodha - Dmat Account) यावरुन रुपये १,१४,४७१/- रुपयांचे शेअर्स कमी झालेले आहे, त्यांबाबत त्यांनी दिनांक ०६/०५/२०२२ रोजी तक्रारी अर्ज सायबर गुन्हे कक्ष येथे दिला.

सदरची तक्रार प्राप्त होताच सायबर गुन्हे कक्षाने तात्काळ कारवाई करीत (Zerodha - Dmat Account) यांचे नोडल अधिकारी यांचेशी ई मेल व्दारे संपर्क साधून सदरचा व्यवहार थांबविण्याबाबत पत्रव्यवहार केला. तसेच तक्रारदार यांचे शेअर्स गेलेल्या Dmat Account बाबत माहिती प्राप्त करुन सदरचा व्यवहार रद्द करण्याबाबत व शेअर्स परत मिळण्याबाबत ई मेलव्दारे वारंवार संपर्क साधून पाठपुरावा केला.

सायबर गुन्हे कक्ष यांचे निर्देशावरुन Zerodha Dmat कंपनीने तक्रारदार यांची फसवणुकी बाबतचे ट्रान्झॅक्शन तात्काळ रद्द करुन फसवणुक झालेली **एकुण १,१४,४७१/- रुपये** रक्कमेचे शेअर्स तक्रारदार यांचे खात्यावर परत जमा केलेले आहे.

सायबर गुन्हे कक्ष यांचेकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, शेअर्स मार्कट मध्ये पैसे गुंतवणुक करताना आपले Dmat Account चे व्यवहार काळजीपुर्वक वारंवार तपासणी करत राहावे.

सदरची कामगिरी मा.श्री.डॉ.महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), मा.श्री.अमोल मांडवे,सहा.पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली सुजितकुमार गुंजकर, पोनि/सायबर क्राईम सेल, सपोनि/स्वप्निल वाव्हळ, पोउपनिरी/प्रसाद शेनोळकर,पोशि/१२०९५ गणेश इलग, पोशि/१२०९२ प्रविण आव्हाड, मपोशि/सुवर्णा माळी, यांनी केली असुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली रक्कम १,१४,४७१/- चे शेअर्स तक्रारदार यांना परत मिळवून देण्यात आलेले आहे.

----